**International Journal of Advance and Applied Research**
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/**
***Volume-13, Issue-3 | January – February 2026***

**Original Article**

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेने निर्माण झालेल्या आर्थिक रोजगार संधीचा अभ्यास

**कु. काजल रणदिवे**

*संशोधक विद्यार्थी*

*अर्थशास्त्र विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर कॉलेज .पंढरपूर*

**Manuscript ID:**
IJAAR-B130392
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 3**
**January – February 2026**
**Pp. 596 - 599**

**Submitted:** 22 Jan.2026
**Revised:** 05 Feb. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***Corresponding Author:***
*कु. काजल रणदिवे*

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.20322772

DOI Link: https://doi.org/10.5281/zenodo.20322772

Creative Commons

OPEN ACCESS

***सार:***

या संशोधन पेपरमध्ये श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे गुरसाळे परिसरामध्ये आर्थिक, सामाजिक व औद्योगिक विकासावर झालेल्या परिणामाचा अभ्यास केला आहे. ग्रामीण भागांमध्ये औद्योगिकीकरण हे आर्थिक विकासामध्ये एक अत्यंत महत्त्वाचे साधन असल्याने, सहकारी साखर कारखाने ग्रामीण भागामध्ये अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे एक प्रभावी माध्यम ठरले आहे. या अभ्यासामध्ये कारखान्याच्या स्थापनेपूर्वी व स्थापनेनंतरच्या परिस्थितीचा अभ्यास केलेला आहे. शेतकऱ्याचे उत्पन्न, कृषी उत्पादन, पायाभूत सुविधा यांचा अभ्यास केला आहे. सदर अभ्यास तुलनात्मक दृष्टीने रोजगार निर्मिती, शेतकऱ्याचे उत्पन्न, दळणवळणाची सुविधा इत्यादी तसेच तेथील कामगार व गुरसाळे गावातील शेतकऱ्यावर होणारा अनुकूल परिणामाचा अभ्यास केलेला आहे. गुरसाळे क्षेत्रात राहत असलेल्या व्यक्तींचे शिक्षण, आरोग्य आणि जीवनमान यामधील बदलांचा विचार करण्यात आला आहे. यामध्ये प्राथमिक व दुय्यम माहितीच्या आधारे असे दिसून आले आहे की साखर कारखान्यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शेतीपूरक व्यवसायांना चालना मिळाली. तसेच परिसरातील आर्थिक विकासामध्ये गतिशीलता वाढले आहे. या संशोधनात काही समस्या जसे की पाणीटंचाई, प्रदूषण आणि व्यवस्थापनेतील अडचणी यांचाही अभ्यास करण्यात आला आहे. एकूणच श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यामुळे गुरसाळे परिसराच्या आर्थिक विकासात लक्षणीय योगदान मिळाले असल्याचे निष्कर्ष निघते

***मुख्य शब्द: औद्योगिक विकास, औद्योगिकीकरण, स्व विकास, रोजगार निर्मिती***

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*कु. काजल रणदिवे. (2026). श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेने निर्माण झालेल्या आर्थिक रोजगार संधीचा अभ्यास. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 596 - 599. https://doi.org/10.5281/zenodo.20322772*

**प्रस्तावना:**

भारत हा कृषिप्रधान देश असून ग्रामीण अर्थव्यवस्थेची चालक शक्ती म्हणजे शेती व त्यावर होणारे उद्योग होय. ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक, सामाजिक व औद्योगिक विकासासाठी सहकारी चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रामुख्याने महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांनी ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासात अमूल्य योगदान घेतलेले आहे. साखर उद्योगामुळे ऊस उत्पादक

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत असून त्यामार्फत रोजगारनिर्मिती पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण, आरोग्य व सामाजिक प्रगतीस चालना मिळते. या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची स्थापना गुरसाळे परिसरासाठी एक कणा ठरला आहे. या कारखान्याच्या स्थापनेनंतर गुरसाळे परिसरात आर्थिक उलथापालथ घडून आली. शेती उत्पन्नात वाढ, रोजगाराच्या संधी, वाहतूक, बाजारपेठांचा विस्तार, तसेच शिक्षण व आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा दिसून येते. त्यामुळे ग्रामीण जीवनमानात सकारात्मक बदल घडून आले आहेत. ग्रामीण भागाचा विकास हा देशाच्या एकूण आर्थिक प्रगतीचा मूलभूत आधार मानला जातो. ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती व शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे, मात्र केवळ शेतीवर आधारित अर्थव्यवस्थेमुळे ग्रामीण भागात बेरोजगारी, अल्प उत्पन्न, स्थलांतर आणि जीवनमानातील असमतोल यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत या समस्यांवर मात करण्यासाठी ग्रामीण औद्योगिकीकरण आणि सहकारी चळवळीचा विकास होणे अत्यंत आवश्यक ठरते.

**उद्दिष्टे :- (Objectives)**:

१) श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे गुरसाळे परिसरातील आर्थिक परिस्थितीत झालेल्या बदलांचा सविस्तर अभ्यास करणे.

२) साखर कारखान्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नावर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करणे.

३) स्थानिक पातळीवरील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीचा अभ्यास करणे.

४) कारखान्यामुळे गुरसाळे भागामध्ये पायाभूत सुविधांचा विकासावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

५) शिक्षण, आरोग्य व सामाजिक सुविधांवर कारखान्याच्या स्थापनेचा झालेला परिणाम समजून घेणे.

६) ग्रामीण भागातील व्यापार, सेवा क्षेत्र व लघुउद्योगांच्या विकासावर साखर कारखान्याचा प्रभाव तपासणे.

७) ग्रामीण समाजाच्या जीवनमानात झालेल्या सामाजिक व आर्थिक बदलांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची व्याप्ती :**

या अभ्यासात श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे गुरसाळे गावातील आर्थिक व सामाजिक विकासावर झालेल्या प परिणामांचा अभ्यास करण्यावर लक्ष दिले आहे. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने सहकारी साखर उद्योगाची भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हा अभ्यास गुरसाळे परिसर व त्यांच्या शेजारील ग्रामीण भागांपुरता सीमित असून कारखान्याच्या स्थापनेमुळे झालेल्या बदलांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासात विशेषत: शेतकरी, कामगार, स्थानिक व्यापारी, सेवा क्षेत्रातील घटक व ग्रामीण कुटुंबे यांचा सहभाग करण्यात आला आहे.

या संशोधनांमध्ये प्रामुख्याने खालील बर्फाचा अभ्यास करण्यात येतो.

१) आर्थिक घटकांचा अभ्यास

२) सामाजिक विकासाचा अभ्यास

३) पायाभूत सुविधांचा अभ्यास

४) रोजगार निर्मितीचा अभ्यास

ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास सहकारी साखर कारखान्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळालेली चालना व त्यांचे दीर्घकालीन परिणाम तपासले आहेत. सदर अभ्यास मर्यादित कालावधी व निवडक क्षेत्रापुरता असल्याने सर्वसाधारण निष्कर्ष काढताना काही

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026


मर्यादा असल्या तरी हा अभ्यास ग्रामीण औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठर

**पार्श्वभूमी:**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळी ही ग्रामीण विकासाची कार्यक्षम साधनरचना म्हणून ओळखले जाते. विशेष करून सोलापूर जिल्ह्यासारख्या निम-कोरडवाहू भागात शेतीवर आधारित अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर अवलंबून असून, ऊस हे प्रमुख नगदी पीक म्हणून विकसित झाले. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी ऊस उत्पादकांना हमीभाव आणि स्थिर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची स्थापना करण्यात आली. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा सहकारी तत्त्वावर आधारित असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सहभागातून व त्यांच्या आर्थिक हितसंबंधांना केंद्रस्थानी ठेवून कार्यरत आहे.

कारखान्याची स्थापना प्रामुख्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नास योग्य बाजारपेठ उपलब्ध असावी. ऊसाला हमीभाव मिळवून देणे आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे हे या उद्देशाने करण्यात आले आहे. या कारखान्याच्या स्थापनेपूर्वी संबंधी परिसरात ऊस उत्पादनासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया, वाहतूक प्रक्रिया, उद्योग व रोजगारांच्या संधी मर्यादित होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेनंतर तथापि ऊस उत्पादनात वाढ झाली व सिंचन सुविधांचा वापर जास्त करण्यात आला आणि कृषी क्षेत्राला चालना मिळाली. कारखान्यामुळे फक्त साखर उत्पादनापुरतेच मर्यादित न राहता वाहतूक, मजुरी, शेतीपूरक व्यवसाय, यांत्रिकी सेवा तसेच अप्रत्यक्ष रोजगारांच्या विविध संधी उपलब्ध झाल्या. त्यामुळे परिसरातील आर्थिक हालचालींना गती मिळाली आणि ग्रामीण विकासाला चालना मिळाली. एकूणच, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा परिसरातील आर्थिक विकासाचा व कृषी विकासाचा एक महत्त्वाचा केंद्रबिंदू बनला असून सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासात मूल्यवान योगदान देत आहे.

**निर्माण झालेल्या रोजगाराच्या आर्थिक संधी:**




**निष्कर्ष :- (Conclusion):**

सदर अभ्यासातून असे आढळून येते की श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे गुरसाळे परिसराच्या आर्थिक व सामाजिक विकासात लक्षणीय बदल झालेले आहेत. कारखान्याच्या स्थापनेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या अभ्यासातून असे निष्कर्ष निघतो की कारखान्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली असून ऊच उत्पादनाला स्थिर बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. वेळेवर ऊस बिल मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक सुरक्षितता वाढली आहे. कारखान्याच्या कार्यामुळे थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात झालेली आहे. कारखान्यामधील कायमस्वरूपी व हंगामी रोजगारासोबतच वाहतूक, दुरुस्ती, किरकोळ व्यापार व सेवा क्षेत्रांमध्ये रोजगारांच्या संधी वाढल्या आहेत. अभ्यासात असेही आढळून आले की कारखान्यामुळे पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळाली आहे. रस्ते,

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

बाजारपेठ, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, दळणवळण सुविधांमध्ये सुधारणा झाल्यामुळे परिसराचा एकूण विकास झाला आहे. शिक्षण, आरोग्य व सामाजिक संस्थांच्या विस्तारामुळे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमानात सकारात्मक बदल झालेला दिसतो. महिला व पुरुषांचा आर्थिक व सामाजिक सहभाग वाढलेला आढळून आला आहे.

तसेच अभ्यासातून काही मर्यादा व समस्या सुद्धा समोर येतात. त्यामुळे पाण्याचा अतिवापर, पर्यावरणीय प्रदूषण, ऊस पिकावर वाढलेले परावलंबन, हंगामी रोजगार हे महत्वाचे आव्हाने आहेत. त्यामुळे पुढील भविष्यात विकास शाश्वत राहण्यासाठी पर्यावरणपूरक उपाययोजना, पिकविविधीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा समतोल वापर करणे आवश्यक आहे. तथापि श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा गुरसाळे गावातील औद्योगिकीकरणाचा यशस्वी नमुना असून सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो हे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**संदर्भसूची :- (References):**

१) श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना.वार्षिक अहवाल गुरसाळे, विविध वर्ष.

२) दे सकाळी, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स. साखर उद्योग व ग्रामीण विकासावरील निवडक लेख.

३) जाधव, व्ही. बी. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था. पुणे : विद्या प्रकाशन, 2014.

४) पाटील, आर. एम. ग्रामीण विकास व सहकारी संस्था.कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, 2017.

५) महाराष्ट्र शासन. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी. मुंबई : महाराष्ट्र शासन, विविध वर्ष.